**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

**संशोधन आराखडा**

# “नांदेड जिल्हयातील नागरी सहकारी बँकांचे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान.”

**(कालखंड 2014 ते 2024)**

मानवविज्ञान विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील
पीएच. डी. पदवीसाठी सादर करावयाचा शोध प्रबंधाचा आराखडा

**संशोधक**

**कु.सविता निवृत्तीराव खिराडे**

सामाजिक शास्त्रे विद्यासंकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**मार्गदर्शक**

**प्रा.डॉ.सुरेश चंद्रकांत मेहेत्रे**

प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
बी.रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी

**संशोधन केंद्र**

**सामाजिक शास्त्रे विद्यासंकुल**

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

# “नांदेड जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान.”

## (कालखंड 2014 ते 2024)

**प्रस्तावना**:-

भारत हा कृषीप्रधान देश आहे भारतात 70% लोक हे शेती व्यवसाय करतात. त्यामुळे महाराष्ट्रातील अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान आहे. ग्रामीण भागात एकमेकांना साहाय्य करण्याची भावना आढळून येते.

व्यक्तिच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, नैतिक आणि शैक्षणिक विचाराचा पाया सहकार आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी ‘एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ’, ‘विना सहकार नही उद्धार’ हे सहकाराचे ब्रीदवाक्य आहे.

सहकार (**Co-Operation**) हा शब्द को-ऑपररी (**Co-operari**) या मूळ लॅटीन शब्दापासून तयार झाला आहे. को (**Co**) म्हणजे सह आणि ऑपररी (**Operari**) म्हणजे काम करणे असा त्याचा अर्थ होतो.

कै. वैकुंठलाल मेहता यांच्या मते, सहकार ही लोकांच्या सामाजिक व आर्थिक उद्धारासाठी चालविलेली एक चळवळ आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की, समान गरजा असणाऱ्या व्यक्ती स्वमताने समान भूमिकेवरून गरजा पूर्ण करण्यासाठी एकत्र येणे, सर्वांनी मिळून एकमेकांच्या मदतीने सर्वांच्या हितासाठी एकत्रित येवून काम करणे याला सहकारात विशेष महत्व आहे.

भारतातील शेतकऱ्यांची सावकारी कर्जातून मुक्ती करण्यासाठी, ग्रामीण प्रश्नांची सोडवणुक करण्यासाठी पहिला प्रयत्न मद्रास सरकारने केला मद्रास

सरकारने सर फेडरिक निकोल्सन यांना शेतीसाठी कश्या प्रकारच्या बँका स्थापन करण्यात येतील याचा अभ्यास करण्यासाठी युरोपला पाठविले.

सर एडवर्ड लॉ. शिफारशीच्या माध्यमातून 25 मार्च 1904 मध्ये पहिला सहकारी पतसंस्था कायदा संमत झाला. परंतु या कायद्यानुसार फक्त पतपुरवठा सहकारी संस्थाच यामध्ये नोंदविता येत होत्या. नंतर या कायद्यामध्ये सुधारणा करून दुसरा कायदा 1912 मध्ये सहकारी संस्थांचा कायदा संमत केला. या कायद्यामध्ये बिगर पतपुरवठा संस्थांच्या स्थापनेला मान्यता देण्यात आली. मुंबई सरकारने 1925 मध्ये पहिला राज्य सहकारी संस्था कायदा समत झाला. 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली त्यावेळी अनेक नेत्यांनी सहकार चळवळीच्या विकासात महत्वाची भूमिका बजावली.

**नागरी सहकारी बँक**:-

महाराष्ट्राच्या निर्मीतीनंतर विविध प्रकारच्या संस्था कार्यरत आहेत. त्याच प्रमाणे नागरी सहकारी बँका हा एक महत्वाचा अर्थपुरवठा करणारा घटक शहरी भागात कार्यरत आहे. शहरी व निमशहरी भागातील विविध गरजू घटकांना मदत करण्यासाठी ह्या बँका स्थापन झाल्या. श्री. हर्मन शुल्झ यांनी जर्मनीमध्ये पहिली नागरी बँक सुरू केली. त्याच प्रमाणे इटली मध्ये लुझाटी यांनी पतसंस्था स्थापन केली.

या आधारे भारतामध्ये श्री.विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांच्या नेतृत्वाखाली बडोदा येथे 05 फेब्रुवारी 1889 मध्ये ‘अन्योन्य सहाय्यकारी मंडळ’ या नावाची

नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करण्यात आली. याच संस्थेला 1904 च्या कायद्यानुसार कायदेशीर दर्जा प्राप्त झाला. त्यामुळे ही भारतातील पहिली नागरी बँक म्हणून उल्लेख केला जातो. महाराष्ट्र प्रांतात 1906 मध्ये दि. शामराव विठ्ठल सहकारी बँक लि. ही मुंबई येथे स्थापन करण्यात आलेली पहिली बँक आहे.

'ज्या प्राथमिक सहकारी बँका शहरी व निमशहरी भागात स्थापन झालेल्या आहेत त्यांना नागरी सहकारी बँक असे म्हणतात.'

'शहरी भागातील लोकांना बँकींग सेवा पुरविणाऱ्या व तसेच लहान व्यापारी, कारागीर, मध्यमवर्गीय पगारदार व्यक्ती यांना कर्ज पुरवठा करणाऱ्या बँकेला नागरी सहकारी बँक असे म्हणतात.'

सध्या विविध शहरामध्ये नागरी सहकारी बँकांची स्थापना झालेली दिसून येते तसेच त्यांच्या शाखांचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. नागरी सहकारी बँकेचे आर्थिक आणि सामाजिक विकासात काय योगदान असते या संदर्भात अभ्यास करण्यासाठी -

"नांदेड जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान: **[2014-2024]."** हा संशोधन विषय निवडला आहे.

नांदेड जिल्ह्यामध्ये एकूण 16 तालूके आहेत ते पुढील प्रमाणे- नांदेड, अर्धापूर, भोकर, लोहा, कंधार, धर्माबाद, माहुर, मुदखेड, नायगांव, उमरी, मुखेड, बिलोली, किनवट, हिमायतनगर, हदगांव, देगलूर इत्यादी आहे. लहान मोठ्या विविध नागरी सहकारी बँका नांदेड जिल्ह्यात कार्यरत आहेत. त्यांच्या शाखांची, कर्मचाऱ्यांची, ठेवीची, कर्ज वाटपाची स्थिती तसेच आर्थिक व

सामाजिक स्थिती कशी आहे हे अभ्यासण्यासाठी हा विषय निवडण्यात आला आहे.

**विषयाचे महत्व व निवड**:-

नागरी सहकारी बँकेचा मुख्य उद्देश किंवा हेतू नागरी भागातील कमी उत्पन्न असलेल्या दूर्बल घटकांच्या कर्जाच्या गरजा भागवून त्यांना स्वयंपूर्ण बनविणे हा असतो. नागरी सहकारी बँका दूर्बल घटकांना, उत्पादक करण्यासाठी, कर्ज देतात जसे की, बांधकाम, घरबांधणी, दुरुस्ती, शिक्षण, व्यवसाय, छोटे लघू उद्योग इत्यादी तसेच नागरी सहकारी बँका सामाजिक जाणीव ठेवून लग्न समारंभ धार्मिक कार्य मृत्यूकार्य इत्यादी साठी सुद्धा कर्ज पुरवठा करतात. त्यामुळे नागरी सहकारी बँका हा समाजातील महत्वाचा घटक आहे.

थोडक्यात नागरी सहकारी बँका ह्या आर्थिक व सामाजिक विकासात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रित्या कार्य करतात परंतु नांदेड जिल्ह्यातील ग्राहकांच्या सभासदांच्या आर्थिक व सामाजिक क्षेत्रात ह्या बँका महत्वाचे योगदान देतात का? सभासदांना दिल्या जाणाऱ्या कर्जाचा योग्य प्रकारे वापर होतो का? कर्ज दिलेला उद्योजक प्रगतीशील बनत आहेत का? कमी उत्पन्न तसेच दूर्बल घटकांना कर्ज दिले जाते का? दूर्बल घटकांचा नागरी सहकारी बँकांमुळे विकास होत आहे का? इ.महत्वाच्या प्रश्नामुळे प्रस्तूत विषयाची अभ्यासासाठी निवड केली आहे.

**समस्या सुत्रण**:-

नांदेड जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचे आर्थिक व सामाजिक विकासातील योगदानाचा अभ्यास करताना या विषयातील समस्यांचा देखील अभ्यास करणे महत्वाचे ठरते. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील नागरी सहकारी बँका ह्या आपले कार्य व्यवस्थितरित्या करतात का? नागरी सहकारी बँकेच्या समस्या कोणत्या? नागरी सहकारी बँका ग्राहकांचे प्रश्न सोडवितात का? नागरी सहकारी बँका ग्राहकांना, सभासदांना योग्य सेवा देतात का? नागरी सहकारी बँकेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होतो का? ग्राहकांना व सभासदांना कर्ज काढते वेळी कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते. अशा अनेक प्रश्नांच्या अभ्यासासाठी संशोधन विषयाचे अध्ययन महत्वाचे आहे.

**उद्दिष्टे**:-

प्रस्तूत संशोधन विषयाचे अध्ययन पुढील उद्दिष्टांच्या साहाय्याने पूर्ण केले जाणार आहे.

1) नांदेड जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकेचे स्वरुप आणि कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.
2) नांदेड जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकेच्या आर्थिक स्थितीचा व कर्ज विषयक स्थितीचा अभ्यास करणे.
3) नांदेड जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकेच्या बचत व गुंतवणुकीचा अभ्यास करणे.
4) नांदेड जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकेच्या समस्यांचा अभ्यास करणे.

5) नांदेड जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकेच्या विविध योजनांचा अभ्यास करणे.
6) नांदेड जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकेच्या संदर्भात सरकारच्या ध्येय-धोरणांचा अभ्यास करणे.

**गृहीतके**:-

1) नांदेड जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकेच्या आर्थिक विकासात योग्य पद्धतीने प्रगती होत आहे.
2) नांदेड जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकेत सेवा व कर्ज पुरवठा योग्य पद्धतीने पुरविला जातो.
3) नांदेड जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकेचे प्रशासन, संचालक मंडळ, कर्मचारी वर्ग योग्य पद्धतीने कार्य करत आहे.
4) नांदेड जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकेच्या बचत व गुंतवणुकीमध्ये वाढ होत आहे.
5) नांदेड जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकेच्या योगदानामुळे उद्योगाच्या विकासात भर पडली आहे.
6) नांदेड जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकेच्या योगदानामुळे नागरिकांचे आर्थिक व सामाजिक जिवनमान सुधारत आहे.

**संशोधन पद्धती:-**

नांदेड जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकेचे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान:- [2014-2024] या संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी अन्वेशनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

**संशोधन स्त्रोत:-**

प्रस्तूत संशोधनात प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत या साधन सामुग्रीचा अभ्यासासाठी वापर करण्यात येणार आहे.

**प्राथमिक स्त्रोत:-**

प्रस्तूत विषय अभ्यासण्यासाठी अनुसूचीद्वारे माहिती मिळविली जाणार असून प्रश्नावली मुलाखत निरिक्षण पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

**दुय्यम स्त्रोत:-**

प्रस्तूत विषय अभ्यासण्यासाठी दुय्यम साधन सामुग्रीमध्ये संदर्भ ग्रंथ पुस्तके वर्तमानपत्रे, नियतकालिके, मासिके, शासकीय अहवाल, सरकारविषयक अहवाल, संबंधीत बँकांचे वार्षिक अहवाल व संकेतस्थळांचा वापर करण्यात येणार आहे.

**सांख्यिकीय तंत्र:-**

प्रस्तूत विषयासंबंधी उपलब्ध झालेली माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, टक्केवारी, आलेख इत्यादीचा वापर करण्यात येणार आहे.

**नमुना निवडः-**

प्रस्तूत विषय अभ्यासण्यासाठी नांदेड जिल्ह्यात खालील एकूण नागरी सहकारी बँका 06 आहेत.

1. शंकर नागरी सहकारी बँक लि. नांदेड
2. गोदावरी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. नांदेड
3. भाग्यलक्ष्मी महिला नागरी सहकारी बँक नांदेड
4. नांदेड मर्चट्स बँक लि. नांदेड
5. मार्कंडेय नागरी सहकारी बँक लि. नांदेड
6. शंकरराव चव्हाण नागरी सहकारी बँक लि. किनवट

या नागरी सहकारी बँकांपैकी, आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदानाच्या अभ्यासासाठी खालील 03 नागरी सहकारी बँकांची नमुना म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

1) शंकर नागरी सहकारी बँक लि. नांदेड
2) गोदावरी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. नांदेड
3) भाग्यलक्ष्मी महिला नागरी सहकारी बँक नांदेड

**विषयाची व्याप्ती व मर्यादाः-**

प्रस्तुत संशोधन हे फक्त नांदेड जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील 03 नागरी सहकारी बँकांचा अभ्यास करण्यापुरताच मर्यादित आहे. तसेच संशोधन विषयाची व्याप्ती फक्त नांदेड जिल्ह्यातील

नागरी सहकारी बँकांचा आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान **[2014-2024]** अभ्यासण्यापुरतीच आहे.

**प्रकरणांची रुपरेषा:-**

प्रस्तुत संशोधन विषयाची विभागणी एकूण सात प्रकरणात करण्यात आली आहे.

**प्रकरण पहिले-** प्रस्तावना.

**प्रकरण दुसरे -** संशोधन साहित्याचा आढावा.

**प्रकरण तिसरे -** नांदेड जिल्ह्याचा अभ्यास व जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचा अभ्यास.

**प्रकरण चौथे -** नागरी सहकारी बँकांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास.

**प्रकरण पाचवे-** नागरी सहकारी बँकांच्या योजनांचा तसेच आर्थिक व सामाजिक विकासातील योगदानाचा अभ्यास.

**प्रकरण सहावे -** नागरी सहकारी बँकांच्या कर्जाचा आणि वसुलीचा अभ्यास.

**प्रकरण सातवे -** निष्कर्ष व शिफारशी.

**संदर्भ ग्रंथ:- (Bibilography)**


- Kaji H.L. (2005), “Place of Co-operation in National Economy” Studies in Co-operative in Bombay.
- Sharada Y. (1986), The Theory of co-operation Himalaya Publishing, House, Bombay.
- Nakkiran S. (1982), “Urban Co-operative Banking in India” Rainbow Publication.

- Kamat G.S. (1978), “New Dimensions of Co-Operative Management,” Himalaya Publishing House, Bombay.
- महाराष्ट्रातील सहकारी चळवळ - नाथ पब्लिशिंग हाऊस, लातूर
- भारतीय अर्थव्यवस्था - रंजन कोळंबे, भागीरथी प्रकाशन, पुणे
- स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र- 1 - किरणजी देसले., दीपस्तंभ - प्रकाशन
- भारतातील सहकार - चैतन्य पब्लिकेशन, नाशिक
- सहकार तत्व आणि व्यवहार - कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद
- संशोधन पद्धती - डॉ. डि.सी.सावंत व डॉ. रवि एन.सरोदे
- संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन, नागपूर.
- नांदेड जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांचे वार्षिक अहवाल.
- आपला नांदेड जिल्हा- विद्याभारती प्रकाशन.
- व्ही.यु. बडे - सहकार, नांदेड प्रकाशन, पुणे.

**संकेतस्थळे:-**


- https://sahakarayukta.maharashtra.gov.in
- Brainly.in - https://brainly.in
- Maharashtra Times - https://marathi.indiatimes.com
- RBI – https/www.rbi.org.in



**संशोधक**

**कु.सविता निवृत्तीराव खिराडे**
सामाजिक शास्त्रे विद्यासंकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा
विद्यापीठ, नांदेड

**मार्गदर्शक**

**प्रा.डॉ.सुरेश चंद्रकांत मेहेत्रे**
प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
बी.रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, परभणी